

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा वार्षिक अहवाल

कालावधी :

एप्रिल, २०१० ते मार्च, २०११

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा वार्षिक अहवाल

कालावधी :

एप्रिल, २०१० ते मार्च, २०११

सन २०१०-११ चा वार्षिक अहवाल.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा माहे एप्रिल, २०१० ते माहे मार्च, २०११ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

दि. ८ एप्रिल, २०१० रोजी डहाणू जि. ठाणे येथे दोन गटामध्ये झालेल्या दंगलीबाबतचा अहवाल पोलीस अधिक्षक, ठाणे यांच्याकडून आयोगाकडील दि. १९ एप्रिल २०१० च्या पत्रान्वये मागविण्यात आला.

दि. ९ एप्रिल, २०१० रोजी गुराफिरखाना व्यापारी असोसिएशन, फलटन रोड, गुंबई यांनी गाता रमाबाई आंबेडकर पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरिक्षक हे वेगवेगळया प्रकारे त्रास देत असल्याबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. याबाबत दि. १३ एप्रिल, २०१० अन्वये मा.गृहमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी पत्र पाठवून कार्यवाही करण्याची विनंती केली होती. तसेच आयोगाकडून दि. १४ मे, २०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

दि. १९ एप्रिल, २०१० रोजी मुजावर मशिद, मुजावर गल्ली, परंडा, जि. उस्मानाबाद येथे सकाळी कोणीतरी अज्ञान इसमाने मुस्लिम धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने मेंबरवरील कुराण शरीफवर डुकराचे पिल्लू मारुन टाकून मुस्लिम समाजाचे उपासनास्थान अपवित्र करून मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावल्या आहेत. या संदर्भात दि. २४ एप्रिल, २०१० रोजी परंडा जि. उस्मानाबाद येथे मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी भेट देऊन दंगलग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक यांचे सोबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली. सदर घटनेचा अहवाल दि. ७ मे, २०१० च्या पत्रान्वये शिफारशीसह शासनास सादर केला.

दि. ६ मे, २०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्या नोटीस बोर्डवर इस्लाम धर्माची अवमानना करणारे पोस्टर लावल्यामुळे जातीय तणाव आणि दगडफेक/दंगल झाली होती. याबाबतचा अहवाल आयोगाकडील दि. ६ मे, २०१० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून मागविण्यात आला होता.

दि. १६ मे, २०१० रोजी इचलकंरजी, जि. कोल्हापूर येथे झालेल्या जातीय तणावा बाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून आयोगाच्या दि. १७.५.२०१० च्या पत्रान्वये मागविण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत राबविण्यात येत असलेल्या पोलीस शिपाई भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग जिल्हास्तरावर यशस्वीरित्या राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी आणि सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक यांना आयोगाकडील दि. १७ मे, २०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री राज्य अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. अध्यक्ष आणि मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग हे उपस्थित होते.

गोरेगाव, ता. माण, जि. रायगड येथे दि. ११ सप्टेंबर, २०१० रोजी गणपती आगमनाच्या वेळी दोन गटामध्ये जातीय तणाव निर्माण झाला होता. त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक, रायगड यांच्याकडून दि. १४ सप्टेंबर, २०१० च्या पत्रान्वये मागविण्यात आला होता.

शासन पत्र, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०१०/प्र.क्र.४०/१०/का-९, दि. २७ सप्टेंबर, २०१० अन्वये सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर अल्पसंख्याक समाजातील १० उमेदवांराना केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी प्रशिक्षण योजनेस मान्यता देण्यात आली.

श्री. शेख अब्दुल सलीम शे मंहमद हे आष्टी, जि. बीड येथील बसस्थानकावर पुस्तकाचे दुकान चालवत आहेत. महाराष्ट्रातील सर्व परवानाधारक दुकानांच्या परवान्याच्या नुतनीकरणासाठी न्यायालयात गेले होते. त्यानुसार करारपत्र करण्याचे मा. न्यायालयाने आदेश दिले होते. तथापि विभाग नियंत्रक, बीड यांनी जाणीवपूर्वक आष्टी येथील दुकानासाठी निवीदा मागविली होती. याबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केली केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजी सुनावणी आयोजित केली होती.

पेण जवळ असणाऱ्या रामवाडी येथील उपहारगृहाबाबत राज्य परिवहन महामंडळाकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. श्री. नसीम उस्मान खान, पेण जि. रायगड यांनी त्याबाबत निविदा दाखल केली होती. तथापि संबधित अधिकारी यांनी केलेल्या बेकायदेशीर वर्तनाबाबत श्री. नसीम खोत यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या संदर्भात आयोगाच्या कार्यालयात दि. २१.१२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

दि. १६ जानेवारी २०११ रोजी वरुड, जि. अमरावती येथे मुस्लिम व हिंदु मुलांमध्ये शुल्लक वादावरुन विवाद होऊन त्यांचे पर्यावसन हिंदु-मुस्लिम दंगलीमध्ये झाले. त्याबाबतचा अहवाल आयोगाकडील दि. १८ जानेवारी २०११ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, अमरावती यांच्याकडून मागविण्यात आला.

मा. पंतप्रधानांचा नवीन १५ कलमी कार्यक्रम, अल्पसंख्यांक समाजाचे विविध प्रश्न व अल्पसंख्याक शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या या विषयाबाबत दि. १८ जानेवारी, २०११ रोजी मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. अध्यक्ष, आणि सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग हे उपस्थित होते.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ फेब्रुवारी, २०११ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई येथे अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाती राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची आढावा आयोजित करण्यात आली होती.

राज्यातील जैन समाजाला विशेष सवलत मिळण्याबाबत श्री. सुरेश पाटील, माजी महापौर, सांगली यांच्या निवेदनास अनुलक्षून मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या समिती कक्षात दि. २४ फेब्रुवारी, २०११ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

मुंब्रा, जि. ठाणे येथे बहुक्षेत्रीय विकास योजना राबविण्यासाठी हाती घ्यावयाच्या कृती संशोधन अभ्यास प्रकल्पासाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्चास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग दि. ८ मार्च, २०११ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित केली आहे.

मा. अध्यक्ष, आणि सन्मा. सदस्य राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली हे दि. २ मार्च, २०११ ते दि. ६ मार्च, २०११ या कालावधीमध्ये मुंबई येथे आले होते. सदर दौऱ्यामध्ये मालेगाव दंगल पिडीतासोबत काम करणारे वकील यांचेसोबत बैठक आयोजित केली होती. तसेच

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग आणि अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचेसोबत देखील बैठक आयोजित करण्यात आली होती.

जळगाव जिल्ह्यातील पहूर, ता. जामनेर येथे दि. १६ मार्च, २०११ रोजी निर्माण झालेल्या जातीय तणावा संदर्भात आयोगाने दि. १७ मार्च, २०११ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता.

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि. १८ मार्च, २०११ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे वार्षिक परिषद आयोजित केली होती. सदर वार्षिक परिषदेस मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्मा.सदस्य आणि सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग हे उपस्थित होते. सदर वार्षिक परिषदेत सच्चर समितीच्या शिफारशीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती आणि पंतप्रधानाचा नवीन १५ कलमी कार्यक्रम याबाबत आढावा घेतला.

धार्मिक दृष्टया लोकसंख्येची रचना व विभागणी, रोजगार व उद्योग क्षेत्रातील शिरकावाकरिता या भागातील लोकांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणी, समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती, सांप्रदायिक तणावास कारणीभुत असलेले घटक, या भागातील लोकांना शासनाच्या विकास योजनांचा लाभ घेण्यात उद्‌भवणाऱ्या अडचणी इत्यादी बाबींचे शास्त्रीय सर्वेक्षण व अभ्यास करून या भागातील शैक्षणिक, सामाजिक पायाभुत सुविधा विकसित करण्यासाठी तसेच सांप्रदायिक सद्‌भाव व धार्मिक सलोखा वृध्दींगत करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता राज्यात अल्पसंख्याकांचे प्राबल्य असलेल्या मुंबई उपनगरातील मालवणी (मालाड), मदनपुरा, आर्लेम (मालाड), गोवंडी, मानखूर्द, कुर्ला या भागात आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, वांद्रा (पूर्व), मुंबई मार्फत कृती संशोधन प्रकल्प हाती घेण्यास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग दि. २५ मार्च, २०११ अन्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयासाठी निर्लेखित केलेल्या वाहनाच्या बदली नवीन कार्यालयीन वाहन खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास शासन ज्ञापन, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.राअआ-२०११/प्र.क्र.६/११/का.९, दि. २८ मार्च, २०११ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेष वाटप योजना, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीसाठी प्रोत्साहन भत्ता योजना, अल्पसंख्याक बहुल विद्यार्थी असणाऱ्या शाळांना पायाभुत सुविधांसाठी अनुदान योजना या योजनांचा टाटा सामाजिक विज्ञान संस्थेमार्फत अभ्यास/ मूल्यमापन करून योजनेच्या अंमलबजावणीबाबत त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे इ. बाबत करावयाच्या प्रस्तावास अल्पसंख्याक विकास विभागाकडील दि. ३० मार्च, २०११ च्या शासन ज्ञापनान्वये वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्रदानित करण्यात आली.

अल्पसंख्याक कल्याण दिवस

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार दरवर्षी १९ ते २५ नोव्हेंबर हा सप्ताह कौमी एकता सप्ताह म्हणून साजरा केला जातो. सदर कार्यक्रमाचा भाग म्हणून दि. २० नोव्हेंबर हा दिवस अल्पसंख्याक कल्याण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. अल्पसंख्याक कल्याण दिवस साजरा करतांना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून एकात्मता व बंधुभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्यासाठी अल्पसंख्याक कल्याण दिवस साजरा करण्याच्या कार्यक्रमांमध्ये इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी च्या विद्यार्थी/विद्यार्थींनीकरिता **भारतातील सण** या विषयावर जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धा, तसेच शालेय स्तरावर इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वीं च्या विद्यार्थी/विद्यार्थींनीसाठी **धर्म, शांतता आणि सामाजिक** विषयावर मराठी, हिंदी,इंग्रजी व ऊर्दू या भाषांमध्ये निबंध स्पर्धा, प्रथम वर्षे ते अंतिम वर्षे मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू माध्यमातुन शिकणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी **धार्मिक सण सार्वजनिक रित्या साजरे केल्याने दंगली आणि सामाजिक अशांतता पसरते काय ?** या विषयावर स्पर्धा आयोजित करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व शिक्षणाधिकारी यांना आयोगाकडील दि. १४ ऑक्टोबर, २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

अल्पसंख्याक हक्क दिवस

संयुक्त राष्ट्रानी १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकाच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तुत केला आहे. त्यानुसार दरवर्षी जगभर दि. १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये देखील १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबरोबरच अल्पसंख्याकांचे हक्क, घटनेद्वारे अल्पसंख्याकांना असलेले अधिकार, देशाच्या अखंडतेसाठी आणि विकासासाठी असलेली सामाजिक सद्भावनेची गरज आणि अल्पसंख्याकांचा राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये समावेश करण्याची आवश्यकता याबाबत कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजाच्या सर्व घटकामध्ये जागृती करण्याबाबत तसेच तालुका मुख्यालयामध्ये आणि प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कार्यक्रम आयोजित करून अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून देणे अपेक्षित आहे त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत आयोगाकडील दि. ९ नोव्हेंबर, २०१० च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त आणि सर्व पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले होते.

दि. १९ एप्रिल, २०१० रोजी परंडा जि. उस्मानाबाद येथे घडलेल्या घटनेचा दौरा अहवाल.

दि. १९ एप्रिल, २०१० रोजी परंडा, जि. उस्मानाबाद येथील मुजावर गल्ली मस्जिद मध्ये काही समाजकंटकांनी एका डुकराचे पिल्लु विष पाजून मारुन मस्जिदमध्ये फेकले होते आणि मस्जिदची विटबंना केली होती. त्यामुळे परंडा शहरामध्ये तसेच मराठवाडयाच्या विविध भागामध्ये जनक्षोभ उसळून तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. जनक्षोभाचा उद्रेक होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने वेळीच खबरदारी घेतली नाही. यापूर्वी काही समाजकंटकांना काही दिवसांपूर्वीच शहरातील वातारवण दुषित करून दंगल घडविण्याचा प्रयत्न केला होता. या पार्श्वभुमीवर जिल्हा पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागाने सतर्क राहून सामाजिक तणाव निर्माण करणाऱ्या घटना घडविणाऱ्याच्या हालचालीवर नजर ठेऊन वेळीच कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि दुर्देवाने पोलीस यंत्रणेने अशी कोणतीही खबरदारी घेतली नाही त्यामुळे सदर तणावाची घटना घडलेली आहे.

सदर घटना घडल्यानंतर राज्य राखीव पोलीस दलातील जवानांनी परंडा शहरातील अल्पसंख्याक समाजातील लोकांवर अनन्वित अत्याचार केले, घरामध्ये घुसून महिला, वृध्द तसेच लहान मुलांना देखील मोठया प्रमाणात मारहाण करण्यात आली. लुटालूट करण्यात आली. तसेच माजी नगराध्यक्षा राहिलेल्या महिलेस घरामध्ये घुसून मारहाण करण्यात आली ही अत्यंत गंभीर, निषेधार्ह, निंदणीय आणि गुन्हेगारी स्वरुपाची बाब आहे. पोलीसांनी केलेल्या अत्याचाराची अत्यंत गंभीरतेने नोंद घेऊन सदर बाबींची अत्युच्च पातळीवर चौकशी करणे आणि दोषी पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हेगारी कृत्य केल्याबाबत कायदेशीर कार्यवाही केली जाणे आवश्यक आहे.

दि. २४ एप्रिल, २०१० रोजी परंडा शहरास भेट दिल्यानंतर आणि तेथील वस्तुस्थितीची प्रत्यक्षात माहिती घेतल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, काही हिदुत्ववादी पक्ष आणि संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सदरील मस्जिदमधील पवित्र कुरानाची विटंबना करण्याचे कृत्य केलेले आहे आणि त्यास एका माजी लोकप्रतिनिधीचे संरक्षण असल्यामुळे दोषीविरुद्ध कार्यवाही करण्यामध्ये पोलीस दिरंगाई करत आहेत.

दि. २४ एप्रिल, २०१० रोजी प्रत्यक्षात घेतलेल्या माहितीचा आधारे आयोग खालीलप्रमाणे शिफारस करत आहे.

(१) सदर मस्जिदेत पवित्र कुरानची विटंबना करण्याच्या बाबतीत पद्धतशीरपणे तपास करून सर्व गुन्हेगारांना तात्काळ अटक करून त्यांचे विरुद्ध मोक्का (MCOCA) कायद्याखाली त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

(२) ज्या पोलीस कर्मचारी/अधिकाऱ्यांनी घरांमध्ये घुसून महिला, वृध्द, लहान मुलांवर अत्याचार केले आहेत त्याबाबतीत त्वरित उच्चस्तरीय चौकशी करून दोषी पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

(३) वारंवार अशा प्रकाराच्या घटना घडवून सामाजिक तणाव निर्माण करणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांच्या नेत्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी आणि या संघटनांवर त्वरित बंदी घालण्यात यावी.

दि. १४ एप्रिल, २०१० रोजीची आयोगापुढील सुनावणी

मुसाफिरखाना व्यापारी असोसिएशन, साबुसिद्दीक मुसाफिरखाना, पलटन रोड, मुंबई यांनी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री. संजीव कोकीळ, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारीची सुनावणी दि. १४ एप्रिल, २०१० रोजी दुपारी ३.३० वा.आयोगाच्या कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. श्री. संजीव कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे यांनी सुनावणीच्या ३० मिनिटे आधी पत्र पाठवून सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. याबाबत आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली. आयोगाने असे नमूद केले की, सुनावणीची तारीख आणि त्या संदर्भातील सूचना फार पूर्वी जारी केली असतांना केवळ सुनावणी न होऊ देण्याच्या उद्देशाने अशी कार्यवाही केली जाणे अत्यंत आक्षेपार्ह आहे.

मुसाफिरखाना व्यापारी असोसिएशन, साबुसिद्दीक मुसाफिरखाना, पलटन रोड, मुंबई यांच्या प्रतिनिधीनी दि. ९ एप्रिल, २०१० रोजी आयोगाकडे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री.संदिप कोकीळ यांच्याविरुद्ध दुकाने तोडणे, व्यापाऱ्यांकडून लाच स्वरुपात पैशाची मागणी करणे, व्यापाऱ्यांच्या वखारीवर अवैधरित्या छापे मारणे आणि अवैधरित्या वखारींना सील करणे इ. तक्रारी केल्या आहेत. व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींनी अशीही तक्रार केली की, श्रीमती रहिमा शेख ऊर्फ फंटूश नावांची महिला श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे यांच्या वतीने सर्व स्टॉलधारकांकडून, सर्व फेरिवाल्यांकडून, दुकानदार आणि कामगारांकडून हप्ता वसुली करते आणि हप्त्याची रक्कम वरिष्ठ पोलीस निरिक्षकांकडे पोहचविते. तसेच हप्ता न देणाऱ्यांना गुंडाकडून मारहाण करण्यात येते व खोटया केसेस मध्ये अडकविण्याची धमकी देण्यात येते असे आयोगाच्या निदर्शनास आणले. श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी असे सांगीतले की, श्रीमती रहिमा शेख ही व्यक्ती मच्छी विक्रेत्यांची नेता आहे.

अर्जदारांनी असेही कथन केले की, मदिना इमारत सी-६ येथील श्री. मोहम्मद हुसेन यांच्या वखारीवर सील करून श्री. कोकीळ यांनी दोन कामगारांना दोन दिवस बेकायदेशीर डांबून ठेवले होते. तसेच वखारीमध्ये असलेल्या मालाची शंभर पटीने किंमत वाढवून मुल्यांकन केले जाते आणि त्यावर हप्ता मागीतला जातो.

अर्जदारांनी सुनावणी दरम्यान श्री.कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, यांनी वसूल केलेल्या खंडणी संदर्भात सविस्तर कथन करणारे निवेदन सादर केले आहे.

अर्जदारांनी श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांचेविरुद्ध असा स्पष्ट आरोप केला की, श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक हे क्रॉफर्ड मार्केट जवळच न्यु बेंगाल हॉटेलमध्ये वास्तव्य करतात आणि श्रीमती रहिमा शेख ऊर्फ फंटूश ही महिला श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना हप्ता वसुलीच्या रकमा क्रॉफर्ड मार्केट जवळील न्यु बेंगाल हॉटेलमध्ये नेऊन देते.

श्री. मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-१ यांनी असे प्रतिपादन केले की, सदर बाबतीत त्यांना माहिती नसल्याने सविस्तर माहिती घेऊन अहवाल सादर करण्यात येईल. श्री. कोकीळ यांनी सुरवातीपासूनच अर्जदारांनी त्यांची प्रश्नावली द्यावी म्हणजेच मी माझ्या वकीलाशी सल्लामसलत करून त्याचे लेखी स्वरुपात उत्तर देईन अशी भुमिका घेतली.

मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांनी अत्यंत त्रोटक स्वरुपात अतिक्रमणे काढलेल्या तारखांची माहिती दिली.

श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांच्या विरुद्ध भ्रष्टाचाराच्या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत. वरिष्ठ पोलीस निरिक्षक पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांने अशा पध्दतीने दहशत निर्माण करणे, खंडणी वसुल करणे श्रीमती रहिमा शेख ऊर्फ फंटूश या व्यक्तीमार्फत खंडणीच्या रकमा वसुल करणे आणि न्यु बेंगाल हॉटेलमध्ये नेहमी वास्तव्य करणे आणि समाज कंटकासोबत संबंध ठेवणे, व्यापाऱ्याच्या कामगारांना बेकायदेशीररित्या डांबून ठेवणे या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत आणि श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांचे वर्तन पदाला शोभणारे नाही.

आयोगाच्या कार्यालयात जमलेल्या ५०-६० अर्जदारांनी श्री. कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांच्या विरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या, खंडणीच्या आणि दहशत निर्माण करण्याच्या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी केलेल्या आहेत. यावरुन सदर तक्रारी कुप्रसिध्द गुंडाविरुध्द आहेत की शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द असा प्रश्न निर्माण होतो. सदर बाब शासनाच्या तसेच पोलिसांच्या जनमानसामधील प्रतिमेसाठी अत्यंत घातक आहे. यामुळे शासनाचे तसेच पोलीस दलाचे भरुन निघू शकणार नाही अशा पध्दतीचे नुकसान होणार आहे. श्री. संजीव कोकीळ यांची सुनावणी दरम्यानची वागणूक पूर्णपणे असहकाराची, पूर्णपणे उर्मटपणाचे प्रदर्शन करणारी आणि सदेह निर्माण करणारी दिसून आली. सदर अधिकाऱ्याच्या मनमानी वागणूकीमूळे शासनाची व पोलीस दलाची मोठया प्रमाणात बदनामी होत आहे. त्यामुळे अश्या प्रकारचे भ्रष्ट अधिकारी मोठया प्रमाणात जनसंपर्क असलेल्या पदावरुन त्वरीत दूर केले जाणे शासनाच्या व जनतेच्या हिताचे आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग खालीलप्रमाणे शिफारस करत आहे.

शिफारस

१. श्री. संजीव कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे हे कार्यक्षेत्रामधील व्यापाऱ्यांकडून खंडणी वसूल करणाऱ्या आणि समाजकंटकासोबत सबंध ठेवणाऱ्या अधिकाऱ्यास त्वरीत निलंबन करून त्याच्या विरुध्दच्या तक्रारीची त्वरीत सखोल चौकशी करण्यात यावी.

२. श्री. संजीव कोकीळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, पोलीस ठाणे यांच्या विरुध्दच्या सर्व तक्रारींची गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (C.I.D) त्वरीत चौकशी करून सर्व दोषींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात यावेत.

दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजीची आयोगापुढील सुनावणी

श्री. शेख अब्दुल सलीम शे. मंहमद रा. आष्टी जि. बीड यांनी महाव्यवस्थापक, (वाहतुक), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. अर्जदार श्री. शेख अब्दुल सलीम शे. मंहमद यांनी त्यांच्या अर्जामध्ये खालील बाबी नमूद केल्या आहेत.

१) गेल्या ३० वर्षापासून श्री. शेख अब्दुल सलीम शे. मंहमद हे आष्टी जि. बीड येथे बस स्थानकावर पुस्तक दुकान चालवित आहेत.

२) श्री. शेख अब्दुल सलीम शे. मंहमद यांनी सन २००५ मधील उच्चतम निविदेतील रकमेप्रमाणे ऑगस्ट, २०१० पर्यंत संपूर्ण भाडे (फरक) व्याजासह रक्कम रु.६२,९०२/- (रु.बासष्ट हजार नऊशे दोन मात्र) इतकी रक्कम भरली आहे.

३) श्री. शेख यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासोबत पुस्तक दुकानासाठी चौदा वर्षाचा करार केला होता. त्यातील फक्त पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असून नऊ वर्षाचा कालावधी शिल्लक असतांना महाव्यवस्थापक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी सदर दुकानांसाठी फेर निविदा काढली आहे.

४) सन २००५ च्या निविदेमध्ये एकूण ६३ दुकानांची निविदा जाहीर प्रगटन करण्यात आले होते. त्यापैकी फक्त श्री. शेख यांच्या पुस्तक दुकानाची निविदा परत काढण्यात आलेली आहे. इतर १६ दुकाने नवीन आहेत.

५) श्री. शेख हे रु.४५०/- प्रतिमाह भाडे भरत होते परंतु सन २००५ मधील निविदेत श्री.शेख यांनी दुप्पट भाडे भरण्याचे मान्य केले होते.

अर्जदार, विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड यांना परवाना नुतनीकरण करणेबाबत दि. ६ ऑगस्ट, २०१० रोजी प्रत्यक्ष भेटले असता त्यांनी श्री.शेख यांना बाकी रक्कम भरुन टाका तुमचे परवाना नुतनीकरण करण्यात येईल असे सांगीतले. सदर रक्कम रु.६२,९०२/- इतकी दि. १२ जुलै, २०१० रोजी श्री. शेख यांनी भरली आहे.

श्री. शेख यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. महाराष्ट्रातील जवळपास सर्व भाडेकरु न्यायालयात गेले होते. त्या अनुषंगाने परवाना धारकांना मुदतवाढ देतांना प्रथम पाच वर्षे त्यानंतर चार वर्षे व शिल्लक पाच वर्ष मुदतीचे करारपत्र करण्यात यावेत अशा कार्यवाहीचे आदेश न्यायालयाने विभाग नियंत्रक यांना दिले होते. असे असतांनाही महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी पुन्हा निविदा काढली असल्याची तक्रार श्री. शेख यांनी केली आहे.

सदर बाबतीत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजी दु.४.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणीसाठी अर्जदार श्री. शेख अब्दुल सलीम शे. मंहमद आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने कॅप्टन व्ही.व्ही.रत्नपारखी, महाव्यवस्थापक आणि श्री.एस.पी.जोशी डी.टी.ओ. हे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने कॅप्टन व्ही.व्ही.रत्नपारखी, महाव्यवस्थापक यांनी खालील म्हणणे मांडले.

श्री. शेख आणि त्याच्या सोबत अन्य काही दुकानदार न्यायालयात गेले होते. सदर निविदाकारांची याचिका दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), आष्टी, जि. बीड या न्यायालयाने फेटाळली आहे. त्यानंतर

सदर निविदाकार जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या न्यायालयात गेले. त्यावेळी न्यायालयाने सदर ६३ दुकानदारांना मुदतवाढ देण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार सदर निविदाधारांना पाच वर्षाची मुदतवाढ देण्यात आली असून सदर दुकानाचा पाच वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने नवीन निविदा काढण्यात आली आहे.

मात्र सदर ६३ दुकानदारांसोबत १४ वर्षाचा करार टप्याटप्याने करण्याबाबत न्यायालयाने आदेशित केले होते. सदर करारापैकीही श्री. शेख यांच्या दुकानाची पाच वर्षाची मुदत संपुष्टात आली असून उर्वरित नऊ वर्षे शिल्लक असतांना आणि त्यांनी सर्व रक्कम (फरकासह) भरली असतांना त्यांच्या दुकानाला मुदतवाढ न देता ६३ दुकानदारापैकी फक्त श्री.शेख यांच्याच दुकानाची निविदा का काढण्यात आली याबाबत आयोगाकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे स्पष्टीकरण मागण्यात आले असता याबाबत कोणताही खुलासा महामंडळाकडून करण्यात आलेला नाही. यावरुन सदर प्रकरणी खालील बाबतीत निष्कर्ष काढणे आवश्यक आहे.

(१) आष्टी, जि.बीड येथील दुकानासाठीच निविदा प्रक्रिया हेतुपुरस्सरपणे करण्यात आली आहे ?

(२) आष्टी, जि. बीड व्यतिरिक्त अन्य दुसऱ्या ६२ दुकानांना मुदत संपल्यावर निविदा काढण्यात आल्या का ?

(३) निविदा प्रक्रिया संदर्भातील न्यायालयाच्या आदेशाचा भंग झाला आहे का ?

(४) हेतुपुरस्सरपणे अर्जदारासोबत भेदभाव केला जात आहे काय ?

अर्जदारांनी उपस्थित केलेले मुद्दे व महामंडळामार्फत मांडण्यात आलेली बाजू विचारात घेता निविदा सादर झाल्यानंतर अवलबंविण्यात आलेली प्रक्रिया सदोष स्वरुपाची असल्याने सकृतदर्शनी दिसून येते. अर्जदारांकडून सन २००५ मधील उच्चत्तम निविदेतील रकमेप्रमाणे ऑगस्ट, २०१० पर्यंत संपूर्ण भाडे (फरक) व्याजासह रक्कम रु. ६२,९०२/- (रु. बासष्ट हजार नऊशे दोन मात्र) इतकी रक्कम भरली गेली असतांना मुदतवाढ न देता सदर दुकानासाठी फेरनिविदा काढण्यात आली आहे. फक्त एकाच दुकानासाठी फेरनिविदा काढण्यात आली आहे.

यावरून सदर बाबतीत हेतूपुरस्सरपणे अर्जदारास काम मिळण्यापासून वंचित ठेऊन डावलले जात असल्याचे दिसून येते.

सदर बाबतीत अर्जदारासोबत भेदभाव केला जात असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. शासनाच्या मालकीच्या महामंडळाकडून अल्पसंख्याक समाजातील निविदाकाराबाबत अशी भेदभावाची भुमिका घेऊन हेतूपुरस्सरपणे मुदतवाढ न देता फेरनिविदा काढणे अत्यंत अयोग्य, बेजबाबदारपणाचे दर्शन घडविणारी आणि अर्जदाराच्या उपजिवीकेचे साधन हिरावून घेणारी आहे. तसेच अधिकारांचा दुरुपयोग करणारी आहे. सद्य:परिस्थितीत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग पुढील प्रमाणे अंतरित आदेश पारित करीत आहे :—

आदेश

(१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी आष्टी, जि. बीड येथील पुस्तकांच्या दुकानासाठी फेरनिविदा संदर्भात ३० दिवसात Reasoned Order पारित करून त्याची प्रत अर्जदारास द्यावी आणि त्याविरुद्ध दाद मागण्याची संधी अर्जदारास द्यावी.

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सदर निविदा प्रक्रिया थांबवून श्री.शेख यांच्या दुकानाला मुदतवाढ देण्याबाबत दि. १५ ऑक्टोबर, २०१० पर्यंत कार्यवाही करावी.

दि. १ नोव्हेंबर, २०१० रोजीची सुनावणी

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव पो. वाहोली यांनी आयोगाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्या विरोधात आयोगाकडे तक्रार केली आहे.

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव पो. वाहोली, ता. कल्याण, जि. ठाणे येथे मुख्याध्यापक, उच्चश्रेणी या पदावर कार्यरत होते. श्री. पिंजारी यांचे ठाणे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून १९९६ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीमध्ये बदली केली. त्यामुळे मानसिक संतुलन बिघडल्याने श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव, पो. वाहोली हे वैद्यकीय रजेवर गेले त्यामुळे १५ महिन्याच्या रजेच्या कालावधीमधील वेतन श्री. पिंजारी यांना अदा करण्यात आले नसून रु.१५,०००/- (रु. पंधरा हजार मात्र) फंडामध्ये जमा करण्यात आले नाहीत. वारंवार पत्र व्यवहार करून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर रक्कम अदा करण्याबाबत न्यायालयाने आदेश दिले असतांना अद्याप पावेतोही सदर विभागातील अधिकारी कोणतीही कार्यवाही करत नसल्याने सदर प्रकरणावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत श्री. पिंजारी यांनी आयोगाकडे पाठविलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे.

आयोगाकडील पत्र क्र. राअआ/ब.वे./१६६९/२००९, दि. २३ सप्टेंबर, २००९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना सदर प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून जा.क्र.ठाजिप/शिक्षण/ वाशि/आस्था-५/३१७, दि. ६ जानेवारी, २०१० अन्वये सदर बाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे.

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, ता. कल्याण यांची आदेश क्र.पसक/ शिक्षण/वशी/६७२, दि. १० मे, १९९६ रोजी प्रशासकीय कारणास्तव वसत शेलवली येथून सांगोडा शाळेवर बदली करण्यात आली होती. श्री. पिंजारी यांना सुट्टीच्या कालावधीमध्ये बदली आदेश जिल्हा परिषद शाळा वसत शेलवली येथील प्रभारी मुख्याध्यापिका यांनी दि. १२ मे, १९९६ रोजी दिला असता त्यांनी बदली आदेश स्वीकारला नाही व दि. १९ ऑगस्ट, १९९६ पासून रजेचा अर्ज दिला. सदर अर्जात वैद्यकीय रजेवर जात असून हजर होताच अनफिट व फिट प्रमाणपत्र सादर करील असे नमूद केले होते. तसेच अर्जामध्ये रजेचा निश्चित कालावधी नमूद केला नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्या अहवालामध्ये नमूद केले आहे.

श्री. पिंजारी यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांचा दि. १९ ऑगस्ट,१९९६ ते दि. २० ऑगस्ट, १९९७ हा कालावधी असाधारण रजा ग्राह्य धरणेत आला आहे.

श्री. पिंजारी यांनी सदर कालावधीमध्ये अध्यापनाचे काम न केल्याने त्यांना सदर कालावधीचे वेतन देय होत नसून त्यांची सदर कालावधीची रजा (विनावेतन व भत्ते) मंजूर करण्यात आली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी अहवालामध्ये नमूद केले आहे. श्री. पिंजारी यांच्या रजेचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी कायम केलेले आहेत. त्यामुळे श्री.पिंजारी यांना वेतन अदा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याचे सदर अहवालात नमूद केले आहे.

श्री. पिंजारी यांचे बदली आदेश दि. १० मे, १९९६ रोजी काढण्यात आले होते. दि. ८ मे, १९९६ रोजी लोकसभेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली होती त्यामुळे आचारसंहिता भंग होण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच बदली आदेश श्री. पिंजारी यांना दि. १० मे, १९९६ रोजी बजावण्यासाठी पाठविण्यात आला असता त्यांनी तो स्वीकारला नाही. त्यावेळी कोणतीही आचारसंहिता लागू नव्हती. श्री. पिंजारी यांनी बदली आदेश हस्तदेय व पोस्टाने दोन्हीही प्रकारे स्वीकारला नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार देय असलेली ५ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम रु.२८,१८६/- चलनाने जमा करण्यात आली असल्याचे सदर अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

अर्जदाराचे म्हणणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचा अहवाल पाहता खालील बाबी स्पष्ट होणे आवश्यक आहे :—

(१) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांची वसत शेलवली येथून सांगोडा येथे बदली केल्याने आचारसंहितेचा भंग झाला आहे काय ?

(२) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांची बदली करण्यास गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण हे सक्षम आहेत काय ?

(३) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांचा दि. १९ ऑगस्ट, १९९६ चा रजेचा अर्ज वैध आहे काय ?

(४) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांचे दि. १९ ऑगस्ट, १९९६ ते दि. २० ऑगस्ट १९९७ या कालावधीचे रजा मंजुरीचे आदेश योग्य आहेत काय ?

(५) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम कमी जमा करण्यात आलेली आहे काय ?

(६) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांचे पदोन्नतीचे आदेश त्यांना हेतुपुरस्सर विलंबाने देण्यात आले आहेत काय ?

(७) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांच्या प्रकरणाकडे हेतुपुरस्सपणे दुर्लक्ष करून जाणीवपूर्वक भेदभावाची वागणूक देऊन त्यांना त्रास देण्यात आले आहे काय ?

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांनी सादर केलेला अर्ज आणि त्यासोबतची कागदपत्रे पाहता आचारसंहितेचा कालावधी दि. १३ मार्च, १९९६ ते दि. १४ मे, १९९६ हा दिसून येतो. श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव, यांची बदली आदेश क्र.पसंक/शिक्षण आस्था/ वशी ६७२, दि. १० मे, १९९६ अन्वये करण्यात आलेली आहे. बदली आदेशाच्या तारखेस ठाणे जिल्ह्यामध्ये लोकसभेच्या निवडणुकीसंदर्भातील मतदान पार पडले असले तरी आचारसंहिता उठविण्यात आलेली नव्हती आणि सदर बदलीस मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक होते. श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांची वसत शेलवली येथून सांगोडा येथील बदली करण्यात आलेले आदेश क्र.पसंक/शिक्षण आस्था/ वशी ६७२, दि. १० मे, १९९६ हे बेकायदेशीर ठरतात. तसेच निवडणूक संदर्भातील आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे ठरतात. सदरील बदली आदेश गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी काढलेले आहेत. सदर आदेश मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीने किंवा मान्यतेने काढले जाणे आवश्यक आहे. सदर बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने बदली आदेश काढल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे देखील बदली आदेश बेकायदेशीर ठरतात.

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांनी दि. १० सप्टेंबर १९९६ रोजी कार्यालयास अर्ज सादर करून खालीलप्रमाणे कळविले होते :—

मी विनंती अर्ज करतो की, माझी बदली कारणाशिवाय दि. १० मे १९९६ रोजी झालेली असून सदर आदेश हा आचारसंहिताच्या कालावधीत झालेला आहे. या संबंधी मा. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांच्या अनेक वेळा भेटी घेतल्या परंतु त्यांनी आजपर्यंत मला सदर आदेश रद्द करतो असे तोंडी सांगून ही आदेश रद्द केलेला नाही. त्यानंतर मी विनंती अर्ज ही दिला. तरीही त्यांनी दाद घेतली नाही. मला यातून असे दिसले की, ते आकस ठेवून माझ्यावर कार्यवाही करीत आहेत. मला न्याय मिळावा ही विनंती.

आजपर्यंत सेवेत माझी कोणतीही तक्रार अथवा चूक नसतांना मला हा त्रास सहन करावा लागत आहे. तरी माझ्या विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचारात घेऊन मला सदर आदेश रद्द होण्यास व सदर कालावधीतील थकीत वेतनाची तरतूद मिळवून न्याय दयावा ही विनंती.

अर्जदार श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांनी त्यांच्या बदली संदर्भातील गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांच्याकडे दि. २ सप्टेंबर, १९९६ च्या अर्जान्वये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे दि. १५ मे, १९९६ दि. १० सप्टेंबर, १९९६ च्या अर्जान्वये तक्रार केली होती. तसेच त्यापूर्वी दि. २२ डिसेंबर, १९९५ च्या अर्जान्वये देखील तक्रार केली होती. सदर बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्या स्तरावरुन कोणतीही कार्यवाही केली असल्याचे अहवालावरुन दिसून येत नाही. अर्जदारास गट शिक्षणाधिकारी श्री.यु.के.डोंगरे, आणि श्री. कांबळे, लिपिक यांनी निलंबीत करण्याची धमकी दिल्याची गंभीर स्वरुपाची तक्रार असून देखील सदर बाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करणे ही बाब संशयास्पद तसेच गुन्हेगारी स्वरुपाची कृत्ये करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पाठीशी घालून संरक्षण देणारी आहे आणि अर्जदारावर अन्याय करणारी आहे.

अर्जदार श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, दहागाव यांनी दि. १९ ऑगरट, १९९६ रोजी कार्यालयामध्ये रजेचा अर्ज दाखल केला होता. रादर अर्जावर तात्काळ रजा मंजूर करण्याची अथवा नामंजूर करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून केली जाणे आवश्यक होते. तसेच आवश्यकतेनुसार अर्जदारास वैद्यकीय मंडळाकडे तपासणीसाठी पाठविले जाणे आवश्यक होते. तथापि अर्जदार प्रदिर्घ काळ रजेवर असतांनाही सक्षम प्राधिकाऱ्याने अर्जदाराच्या रजा संदर्भात कोणताही निर्णय घेता नाही बाब प्रशासकीय कर्तव्यांमध्ये हेतुपरस्सर दुर्लक्ष करणारी, जाणीव पूर्वक निर्णय न घेऊन अर्जदाराची आर्थिक कुचंबणा करणारी आणि अर्जदारास हेतुपुरस्सर त्रास देणारी ठरते. तसेच सदर बाब कर्तव्यच्युतीमध्ये मोडते. सदर बाब अत्यंत गंभीर आहे. श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांच्या रजा मंजुरी संदर्भात वेळीच निर्णय घेण्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने अक्षम्य चूक केलेली असल्याने तद्नंतर अर्जदाराच्या अनुपस्थितीच्या कालावधीबाबत पारित केलेले आदेश हे अर्जदारास त्रास देण्याच्या उद्देशाने काढले गेले असल्याचे मानण्यास तसेच सदरील आदेश पश्चातबुध्दीने काढले गेले आहेत असे मानण्यास वाव आहे.

त्यामुळे श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांच्या दि. १९ ऑगस्ट, १९९६ ते दि. २० ऑगस्ट, १९९७ या अनुपस्थितीच्या कालावधी संदर्भातील आदेशाचे

पुनर्विलोकन होणे आवश्यक ठरते. अर्जदाराच्या रजा खात्यामध्ये पर्याप्त रजा शिल्लक असल्यास अर्जदाराच्या अनुपस्थितीचा कालावधी सदरील रजा मंजूर करून नियमित करता येऊ शकेल. तसेच अर्जदाराने आयोगाच्या निदर्शनास आणल्यानंतर जर काही कर्मचाऱ्याच्या रजा leave not due मंजूर करून नियमित करण्यात आल्या असतील तर त्याचप्रमाणे अर्जदाराची रजा नियमित केली जाणे आवश्यक आहे. अन्यथा काही कर्मचाऱ्यांना वेगळी वागणूक देण्याची सक्षम प्राधिकाऱ्याची सदरील कृती भेदभावपूर्ण ठरते. त्यामुळे श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांच्या अनुपस्थिती कालावधीसंदर्भात मंजूर करण्यात आलेले असाधारण रजेचे आदेश अयोग्य, अवैध आणि न्यायाच्या तत्वाचे भंग करणारे ठरतात. सदर बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन पुन्हा आदेश पारित केले जाणे आवश्यक आहे.

सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदाराच्या दि. १९ ऑगस्ट, १९९६ ते दि. २० ऑगस्ट, १९९७ या अनुपस्थितीच्या कालावधीचे नियमन करण्याचे आदेश चुकीच्या पध्दतीने काढले गेले असल्याने अर्जदारास सदर कालावधी करिता पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन फरकाची रक्कम अदा होण्यामध्ये तफावत निर्माण झाली आहे. अनुपस्थिती कालावधी संदर्भातील आदेश दुरुस्त गेले गेल्यास सदर तफावत देखील दूर होऊ शकेल आणि अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार नाही.

श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांचे पुढील पदावरील पदोन्नतीचे आदेश गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांच्या कार्यालयात दि. ८ एप्रिल, २००९ रोजी प्राप्त झाले आणि गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कल्याण यांनी श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांच्या पदोन्नतीचे आदेश दि. २३ जुलै, २००९ रोजी जारी केले यावरून गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण आणि त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी हेतुत: पदोन्नती आदेश अर्जदारास दिले नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदरील बाब अर्जदाराचे न्याय्य हक्क डावलणारी, अत्यंत गंभीर, गुन्हेगारी स्वरुपाची, भेदभावाची वागणूक देणारी आहे. सदर अधिकारी कर्मचारी यांनी संगनमताने अल्पसंख्याक समाजाच्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीचे लाभ घेण्यापासून वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध सक्षम प्राधिकारी, जिल्हा परिषद यांनी गुन्हा दाखल करून तसेच विभागीय चौकशी करून वेळीच कार्यवाही करणे आवश्यक होते. मात्र तसे न करता सक्षम प्राधिकाऱ्यांनी गुन्हेगारी वृत्तीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांना संरक्षण देऊन अर्जदारावर केलेल्या अन्यायावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांना पदोन्नतीच्या आदेशाच्या मूळ दिनाकांपासून पदोन्नतीचे सर्व लाभ दिले जाणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणाची सर्व पार्श्वभूमी पाहता सदर प्रकरणामध्ये अर्जदारास हेतूपुरस्सरपणे भेदभावपूर्ण वागणूक दिली गेली असल्याचे आणि जाणिवपूर्वक अर्जदारावर अन्याय केला गेला असल्याचे दिसून येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, यांनी देखील सदर प्रकरणाकडे न्यायबुध्दीने न पाहता अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालून अर्जदारासोबत अन्याय आणि भेदभाव केला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, यांनी भारतीय राज्य घटनेतील मुलभूत हक्कांचा आणि विशेषत: भारतीय राज्य घटनेतील कलम १४ आणि १६ चा भंग केला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

वरील विवेचन पाहता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

(१) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांची जिल्हा परिषद शाळा, वसत शेलवली येथून जिल्हा परिषद शाळा सांगोडा येथे बदली करण्यासंदर्भात पारित करण्यात आलेले आदेश आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीमध्ये काढले असल्याने निवडणूक आचारसंहितेचा भंग करणारे आणि बेकायदेशीर ठरतात.

(२) श्री. काळूभाई शेखलाल पिंजारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा दहागाव यांच्या रजे संदर्भातील आदेश योग्य पद्धतीने काढले गेले नसल्याने तसेच पश्चात बुध्दीने काढले गेले असल्याने सदर आदेश रद्द करून श्री. पिंजारी काळूभाई शेखलाल यांच्या रजा अर्जाबाबत पंचायत समिती मुरबाड अंतर्गत श्री. निंबाळकर, धसई-बीट आणि श्री. खंबायत, मुरबाड बीट यांच्या प्रकरणाप्रमाणे फेरविचार करण्यात यावा आणि फेर आदेश काढण्यात यावेत.

(३) श्री. पिंजारी काळूभाई शेखलाल यांच्या अनुपस्थिती कालावधीबाबत निर्णय झाल्यानंतर श्री. श्री. पिंजारी काळूभाई शेखलाल यांच्या पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे तसेच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करून फरकाच्या रकमा तात्काळ अदा करण्यात याव्यात.

(४) श्री. पिंजारी काळूभाई शेखलाल यांच्या पदोन्नतीचे आदेश तात्काळ देण्याच्या कर्तव्यामध्ये कसूर केलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या विरुद्ध तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी आणि जबाबदारी निश्चित करून विभागीय चौकशी करण्यात यावी. तसेच त्यांच्या गोपनीय अभिलेख्यांमध्ये प्रतिकुल शेरे नोंदविण्यात यावेत.

(५) सदर बाबतीतील सर्व कार्यवाही ३० दिवसांमध्ये पूर्ण करून त्या संदर्भातील अहवाल महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास विनाविलंब सादर करण्यात यावा.

(६) खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

श्री. नसीम उस्मान खोत, शिवाजी चौक, मु.पो. पेण यांच्या तक्रारीवरील सुनावणी दि. २१ डिसेंबर, २०१०

रामवाडी जि. रायगड येथील बस स्थानकावरील उपाहारगृहासंदर्भात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी मागविलेल्या निविदेबाबत श्री. नसीम उस्मान खोत, शिवाजी चौक, पेण यांनी श्री. बच्छाव, महाव्यवस्थापक, (वाहतुक) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार केली होती.

रामवाडी जि. रायगड येथील बस स्थानकावरील उपाहारगृहासंदर्भातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मागविलेली निविदा दि. ४ नोव्हेंबर, २००९ रोजी उघडण्यात आल्या होत्या आणि दि. १७ डिसेंबर, २००९ रोजी विभागीय छाननी समितीने श्री. नसीम खोत यांना सुनावणीसाठी बोलाविले होते. तद्नंतर श्री. बच्छाव, महाव्यवस्थापक, (वाहतूक) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनी अर्जदार श्री. नसीम खोत आणि अन्य निविदाकारास निविदेच्या देकारासाठी रक्कम नव्याने वाढवून बंद पाकीटामध्ये देणेबाबत सूचित केले. अर्जदार श्री. नसीम खोत यांनी सदर बाबतीत लेखी पत्र मागितल्यानंतर श्री. बच्छाव, महाव्यवस्थापक, (वाहतूक) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनी असे पत्र देण्यास असमर्थता व्यक्त केली.

अर्जदाराच्या तक्रारी संदर्भात महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीसाठी अर्जदार श्री. नसीम खोत आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने श्री. व्ही.व्ही. रत्नपारखी, महाव्यवस्थापक आणि श्री. एस.पी. जोशी, डी.टी.ओ. मुख्य कार्यालय हे उपस्थित होते.

दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजीच्या सुनावणीदरम्यान महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून सदर बाबतीतील सविस्तर अहवाल दाखल करण्यात आलेला नव्हता. तसेच स्थायी आदेशाची प्रत दाखल करण्यात आलेली नव्हती. निविदा दि. ४ नोव्हेंबर, २००९ रोजी निविदा उघडण्यात आल्यापासून सुनावणीच्या दिनांकापर्यंत जवळजवळ १० महिन्याचा कालावधी लोटून देखील काहीही निर्णय घेण्यात आलेला नव्हता. त्यामुळे हेतुपुरस्सरपणे कालापव्यय करून जास्त देकार देणाऱ्या निविदाकाराला काम मिळण्यापासून वंचित ठेवून डावलले जात असल्याचे दिसून आल्याने आणि सकृतदर्शनी अर्जदारासोबत भेदभाव केला जात असल्याने आयोगाने खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केले होते.

(१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनी रामवाडी बस स्थानकावरील उपाहारगृहाच्या निविदा संदर्भात ३० दिवसात Reasoned order पारित करून त्याची प्रत अर्जदारास उपलब्ध करून द्यावी आणि त्या विरुद्ध दाद मागण्याची संधी द्यावी.

(२) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने तद्नंतर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे आदेश अर्जदाराचे म्हणणे आणि महामंडळाचे म्हणणे संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह आयोगाकडे दि. १५ ऑक्टोबर, २०१० पर्यंत सादर करावे. महामंडळाचे सविस्तर म्हणणे सादर झाल्यानंतर सदर बाबतीत पुढील सुनावणी आयोजित करण्यात यावी.

आयोगाच्या आदेशा संदर्भात महाव्यवस्थापक, (वाहतूक) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनी आयोगाकडे दि. २९ नोव्हेंबर, २०१० रोजी प्राप्त झालेल्या पत्र क्र. राप/वाह/ वाआ/ ७२०१, दि. १८ नोव्हेंबर, २०१० अन्वये आयोगास खालीलप्रमाणे कळविले आहे.

विभाग नियंत्रक, रायगड यांनी मागविलेली निविदा सुचना क्र.३/२००९ रद्दबातल करण्यात आलेली आहे. तसेच या आस्थापनेकरिता म्हणजेच रामवाडी बसस्थानकावरील उपाहारगृहासाठी फेर निविदा काढण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. या संदर्भात श्री. खोत यांना विभाग नियंत्रक, रायगड यांनी त्यांचे पत्र क्र. ५४२, दि. ९ ऑक्टोंबर, २०१० नुसार कळविले आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सोबत देण्यात येत आहे.

अर्जदाराचे म्हणणे/तक्रार आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा अहवाल पाहता खालील प्रश्नांची उत्तरे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

(१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी रामवाडी स्थानकावरील उपाहारगृहासंदर्भातील निविदेबाबत निर्णय घेतांना सकारण आदेश (reasoned order) पारित केले आहेत काय ?

(२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी अर्जदार श्री.नसीम खोत यांना सकारण आदेशांबाबत (reasoned order) दाद मागण्याची संधी आहे काय ?

(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी नैसर्गीक न्याय तत्वांचा अवलंब केला आहे काय ?

(४) अर्जदार श्री. नसीम खोत यांनी रामवाडी बस स्थानकावरील उपाहारगृहाचे काम मिळण्यासाठी सादर केलेल्या निविदेबाबत निर्णय घेतांना श्री. नसीम खोत यांचेवर अन्याय झाला आहे काय ? तसेच श्री. नसीम खोत यांच्याशी भेदभाव झाला आहे काय ?

(५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापनाने घेतलेला फेरनिविदा काढण्याचा निर्णय न्यायोचित आहे काय ?

आयोगाने सदर बाबतीत अत्यंत सुस्पष्ट आदेश पारित करून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना ३० दिवसात reasoned order पारित करून त्या संदर्भात अर्जदार श्री. नसीम खोत यांना दाद मागण्याची संधी देण्याबाबत आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे आदेश व त्यावर श्री. नसीम खोत अर्जदार यांचे म्हणणे आणि महामंडळाचे म्हणणे दि. १५ ऑक्टोंबर, २०१० पर्यंत सादर करण्याबाबत सुचित केले होते. तथापि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही केलेली नाही. निविदा प्रक्रिया रद्द करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचा अवलंब केला जाणे आणि उच्चतम देकार देणाऱ्या निविदाकारास निविदा रद्द केल्याबाबत सकारण कळविले जाणे आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेणे उचित ठरले असले. तथापि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी अशी कार्यवाही केलेली नाही. नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचा पुर्णपणे भंग करून अर्जदाराच्या न्याय्य हक्काची पायमल्ली केली आहे आणि अधिकाराचा दुरुपयोग करून निविदा रद्द केली आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने स्थायी आदेश क्र. ११९९, दि. ३ मार्च, २००८ च्या परिच्छेद क्र. ५ मध्ये निविदाद्वारे परवाना धारकाची निवड करण्याची कार्यपध्दती विहित केली आहे.

सदर पध्दतीमध्ये परवाना धारकाची निवड करण्याचे अधिकार आणि निविदा अर्जांची छाननी करून करावयाची कार्यवाही याबाबत कार्यपध्दती विहित केलेली असून प्रत्येक बाबीसाठी कालमर्यादा ठरवून देण्यात आली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी निविदा उघडण्यापासून ते रद्द करण्यापर्यंत १० ते ११ महिन्याचा कालावधी लावला आहे या कालावधीमध्ये अर्जदाराची मोठी रक्कम महामंडळाकडे अडकवून ठेवण्यात आली आहे. निविदेसंदर्भात निर्णय घेण्यास लावण्यात आलेल्या प्रदिर्घ कालावधीवरुनच महामंडळाचे व्यवस्थापन अर्जदार श्री. नसीम खोत यांच्यासोबत हेतुपुरस्सर भेदभावपूर्ण वागणूक दिल्याचे आणि अर्जदारास हेतुपुरस्सरपणे काम दिले नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सदर बाब भारतीय संविधानातील मुलभूत हक्कांची पायमल्ली करणारी आहे. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधील इतर अधिकाऱ्यांनी अर्जदार श्री.खोत यांच्यासोबत भेदभावपूर्ण वागणूक दाखवून त्यांना रामवाडी बस थांब्यावरील उपाहारगृहासंदर्भातील निविदा मिळण्यापासून वंचित ठेवले आहे आणि अर्जदाराच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली केली आहे हे यावरुन सिध्द होत आहे.

निविदा मागविल्यानंतर त्याद्वारे प्राप्त दर स्वीकारणे किंवा नाकारणे याबाबतीतील निर्णय त्वरित घेतला जाणे अपेक्षित आहे. स्थायी आदेशामध्ये तरतूद नसतांना निविदाकराकडून पुन्हा बंद पाकिटामध्ये दर सादर करण्यास सुचविणे आणि त्यासाठी कोणतेही लेखी पत्र न देणे यावरुन अधिकाराचा दुरुपयोग करण्याची arbitrary कृती दिसून येते तसेच विहित कार्यपध्दतीचा भंग केल्याचे दिसून येते. reasoned order पारित करून अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेण्याबाबत आदेशित केले असतांनाही कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करून नवीन निविदा मागविण्याची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांची कृती अधिकाराचा दुरुपयोग करणारी, अन्याय करणारी आणि मनमानी कारभाराची आणि arbitrary असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व्यवस्थापनाने दि. २७ ऑगस्ट, २०१० रोजीच्या सुनावणीमधील निर्देशानुसार आयोगास सविस्तर अहवाल सादर करण्याची तसदी घेतलेली नाही. यावरुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापन सादर बाबतीत गंभीर नसल्याचे दिसून येते. तसेच अल्पसंख्याक समाजातील अर्जदार श्री. नसीम खोत यांच्या तक्रारीबाबत व्यवस्थापन असंवेदनशील असल्याचे आयोगाचे मत झाले आहे.

